# सेवक वार्ता

फेब्रुवारी-२०२६

वर्ष -७ अंक- ४

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन



कै. अजितदादा पवार यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली .

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, प्रभावी प्रशासक, निर्भीड राजकीय नेतृत्व अजितदादा पवार यांच्या बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ दुर्दैवी निधनाची बातमी ऐकून अख्खा महाराष्ट्र सुन्न झाला आहे. हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात काळाकुट्ट दिवस म्हणून नोंदला जाईल.

सडेतोड, स्पष्टवक्ते, तितकेच मिश्कील...!!!!

दमदार आणि दिलदार हा अजितदादांचा खरा स्वभाव होता.

अजितदादा म्हणजे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते; ते एक संस्था होते. अक्षय ऊर्जेसारखी अखंड कार्यक्षमता, पायात भिंगरी बांधल्यासारखा वेग, कार्यकर्त्यांचे मोहळ उभे करणारी करिष्माई शैली आणि जशास तसे उत्तर देणारा खमकेपणा म्हणजे अजितदादा.

खड्या आवाजातली त्यांची दरडावणी नवख्यांना रागासारखी आणि संतापलेली वाटायची; पण त्या आवाजामागे लपलेली होती माया, आपुलकी आणि हळवेपणा आणि मिश्कीलपणा !! स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा याबाबत दादांकडे कसलीही तडजोड नसे. वेळेचे काटेकोर पालन हा त्यांच्या जीवनाचा श्वास होता.सदैव वेळ पाळणारे दादा, वेळेआधीच निघून गेले... एखादा नेता घडायला पंचवीस वर्षे लागतात, पण संपायला पाच सेकंदही पुरतात .

अजित दादा पवार यांनी अकाली निरोप घेतला, त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.


## सेवक संघ महाराष्ट्रची सन २०२४-२५ ची वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न

दिनांक १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवक संघ महाराष्ट्रची वार्षिक सर्व साधारण सभा आमझरी (चिखलदरा) येथे आयोजित आली होती.

### सभेची ठळक वैशिष्ठ्ये ........

**वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी विषयसुची-**

१. सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन.
२. गतवर्षी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेली चर्चा व ठराव तसेच वर्षभरात झालेली कामे यांचा आढावा.
३. दिवंगत सदस्यांनाआदरांजली.
४. सेवक संघाने सादर केलेल्या परंतु अद्याप प्रलंबित असलेल्या कामांचा आढावा.
५. GIS, कम्प्युटर सायन्स या विषयातील तज्ञ व्यक्तींना सेवक संघाचे सदस्य करुन घ्यावे, जेणेकरून काही विशिष्ट क्षेत्रिय कामे, दस्तऐवजीकरण (documentation), सल्लागार सेवा प्रकल्प (consultancy services projects) यामध्ये मदत होईल.
६. सल्लागार सेवा प्रकल्प बाह्य स्रोत ( source out) करण्याबाबत धोरण ठरविणे (Strategies to source out source out Consultancy Projects).
७. वानिकी आणि वन्यजीव व्यवस्थापन या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण दस्तऐवजीकरण (documentation) करणाऱ्या वनपाल व वनरक्षक यांचा सत्कार करणे व पारितोषिक देणे.
८. सेवक वार्ता या नियतकालिकाचे संपादक होण्यासाठी इतर सदस्यांना संधी देणे.
९. सेवक संघाची सदस्य संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.



- सकाळचे सत्र.

1. सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत आहे.
2. प्रास्ताविक कार्यकारी अध्यक्ष
3. दिवंगत सेवक सदस्यांना श्रद्धांजली.
4. गतवर्षीच्या सभेच्या कार्यवाहीस मान्यता.
5. सन 2025.26 मधील कामांचा आढावा.
6. मागील वर्षासाठी लेखापरीक्षणास सादर करणे आणि मान्यता देणे.
7. वृत्तीय शाखाद्वारे केलेल्या कामांचा आढावा.
8. इतर अजेंडा आयटम.
9. नवीन पदाधिकाऱ्यांची निवड
10. समारोप सत्र.

- शिवजयंतीचे स्फूर्तीदिनी आमझरी येथे आयोजीत केलेल्या सेवक संघाच्या आम सभेचे शिस्तबध्द व सर्वंकष नियोजन व अंमलबजावणी केल्याबद्दल तुमचे,सेवकच्या अमरावती शाखेतील सर्व सदस्यांचे,व्याघ्र प्रकल्प मेळघाटातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन. सन्मान चिन्हातील वृक्ष व वाघ संमोहित करणारे आहेत. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.
- श्री जगताप यांच्या नेतृत्वात आयोजन करून संस्मरणीय स.सा. वार्षिक सभा घेतली. तो मेळघाटातील एक खास प्रसंग होता. श्री जगताप यांनी सर्व तपशील प्रभावीपणे उपस्थित केला होता. वाघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या झाडांचे स्मरणिका जंगल आणि वन्यजीव संरक्षण काय आहे याबद्दल खूप काही सांगते. शिबिर व भोजन व्यवस्था उत्तम होती. या बैठकीत भविष्याचा वेध घेणारा विस्तृत कॅनव्हास प्रभावीपणे मांडण्यात आला. सभेला उपस्थित असलेले सेवक सदस्य, त्यांच्याशी झालेला संवाद खूप आनंदाचा आणि नॉस्टॅल्जिक होता.
- श्री एम.एम. कुलकर्णी यांनी गेल्या वर्षभरात काय साध्य केले आणि काही प्रकरणांमध्ये आपल्याला जाण्याची गरज आहे, याचे उत्कृष्ट संकलन आणि सारांश दिले. प्रादेशिक शाखांनी त्यांच्या कार्यपत्रिका सादर केल्या होत्या. यामुळे सेवकच्या कार्यामध्ये स्पष्टता आली. श्री धोपेश्वरकर यांनी आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळून तपशील प्रभावीपणे मांडला होता.
- आमझरी ला भेट देणे हा एक अद्भुत अनुभव होता. प्रत्येक बाबतीत अप्रतिम काम केले.. जागेची निवड, खानपान, निवास, स्थानिक वनविभागाशी संवाद, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा सत्कार. अशा दुर्गम स्थळी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते . पण टीम अमरावतीने कोणतीही कसर सोडली नाही. अमरावती टीमचे अभिनंदन.






























सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र
मी वनरक्षक पुस्तक विमोचन
आणि
उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वन अधिकाऱ्यांचा
सन्मान सोहळा
दिनांक - १९ फेब्रुवारी २०२६
स्थळ - आमझरी पर्यटक संकुल (चिखलदरा) अमरावती














मृत्यू हे जीवनाचं अंतिम आणि अटल सत्य आहे. तो कुणाला कधी, कुठे आणि कसा भेटेल याचा काहीही नेम नाही. सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी परत येईलच याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत, ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि "अजून मिळवायचं आहे" या विचारात आजचा क्षण निसटून जातो.

आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे याची जाणीव होते. त्या वेळी लक्षात येतं की पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता या सगळ्या गोष्टी तिथेच थांबतात. माणसासोबत जातं ते फक्त त्याने कमावलेलं प्रेम, केलेली माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण. म्हणूनच नात्यांकडे दुर्लक्ष करू नका. आई-वडिलांशी बोला, मित्रांशी मन मोकळं बोला.

मनात राग, मत्सर, अहंकार साठवू नका. माफ करणं शिका, कारण वेळ कोणासाठीही थांबत नाही. भौतिक सुख क्षणिक आहेत—सगळी मोहमाया आहे; पण समाधान, प्रेम आणि शांतता हीच खरी कमाई आहे. उद्या काय होईल माहित नाही, पण आज आपल्या हातात आहे. म्हणून आजचा दिवस जगा, मनापासून जगा, प्रामाणिकपणे जगा.



## पर्यावरण जन जागृतीचा निस्सीम पुजारी .....

**श्री. रामदास पुजारी**

**पर्यावरणविषयक जन जागृतीसाठी पुणे महा नगर पालिकेने गेल्या अनेक वर्षांपासून पुण्यात चौका-चौकात श्री. रामदास पुजारी यांची काही घोषवाक्ये प्रसारित केली आहेत व काही वर्षांपासून या प्रदर्शनातही ती प्रसारित करण्यात येत आहेत. पुणे महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाद्वारा छत्रपती संभाजीराजे उद्यान, पुणे येथे दिनांक १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित ४४ वे फळे, फुले व भाजीपाला प्रदर्शन-२०२६ मध्ये त्यांची बरीच पर्यावरण विषयक घोषवाक्ये प्रसारित करण्यात आलीत. ही वाक्ये लाखो पुणेकर वाचतील. श्री. रामदास पुजारी "सेवक" संघ सदस्य असण्यासोबतच पर्यावरणाचेही "सेवक" आहेत.**




**यासाठी मुख्य उद्यान अधीक्षक अशोकजी घोरपडे व महानगरपालिकेचे इतर अधिकारी, कर्मचारी यांचे पुजारी हार्दिक आभार मानलेत.**

# तंट्या भिल्ल

शब्दांकन- मनोहर सैंदाणे
सेनि विवअ, पुणे

**नुकतीच म्हणजे २६ जानेवारी २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर व लोक नालक तंट्या भिल्ल यांची १८४ जयंती साजरी झाली. त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील अनमोल योगदानाबद्दल सेवक संघाकडून ही आदरांजली.**

तंट्या एक शांत स्वभावाचा मुलगा. समाजातील सर्वात दुर्लक्षित वर्गातला. फक्त अन्यायच पाहिलेला. सत्तेपुढं हतबल कुटुंब आणि कोवळ्या वयात डोळ्यांदेखत आईचा मृत्यू पाहिला. बापाचेही प्रचंड हाल पाहिले. त्याच व्यवस्थेचा तोही बळी ठरला. अखेर हा मुलगा बंडखोर झाला. एवढा की, त्या व्यवस्थेलाही घाम फुटावा. ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडलं आणि आज इतिहासात त्याची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली. माय बापाचे मृत्यू पाहिले, व्यवस्थेने हाती शस्त्र दिले. पुढे त्यास ' इंडियन रॉबिनहूड' म्हणून संबोधण्यात आले.



तो म्हणजे "तंट्याभील"अशी ओळख असलेला महानायक. तुम्हाला एखाद्या सिनेमाची गोष्ट वाटू शकते. पण ज्यांच्या खऱ्याखुऱ्या आयुष्याची ही गोष्ट आहे, त्यांचं जीवन त्याहीपेक्षा महाकठीण म्हणावं असं आहे. जन्माच्या 180 हून अधिक वर्षांनंतरही या आदिवासी जननायकाचं जीवन खऱ्या अर्थानं अनेकांना प्रेरणा देणारं आहे. आदिवासी समाजासाठी केलेल्या कामामुळं तर त्यांना समाजबांधवांनी जणू देवत्व अर्पण केलं..

भारतीय स्वातंत्र लढ्याच्या इतिहासाप्रमाणे या आदिवासी भिल्ल क्रांतिकारकांचा इतिहास ही महत्त्वाचा आहे, जो बाकीच्या क्रांतिकारकांच्या प्रमाणे सगळ्यांच्या पुढे आला नाही. बलाढ्य ब्रिटिश सत्तेला सतत अकरा वर्ष सळो कि पळो करणारे हे क्रांतिकारक दुर्लक्षितच राहिले. व त्यांना ब्रिटिश सत्तेने कायम दरोडेखोर याच दृष्टिकोनातून बघितले. भारतीय रॉबिनहुड क्रांतिकारक तंट्या भील यांच्या स्मरणदिवस माहे डिसेंबर मध्ये होता . त्या निमीत्त विनम्र अभिवादन .

### बालपण

मध्य प्रांतातील निमाड जिल्ह्यातील एका खेड्यात १८४२ साली तंट्या भिल्ल यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊसिंग होते. भिल्लांना स्वसंरक्षणासाठी लहानपणापासून भालाफेक आणि धनुष्यबाण चालवण्याचे शिक्षण मिळे. या युद्धकलांमध्ये तंट्या तरबेज होते.

१८५७ या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या समयी तंट्या मामाचा परिचय सेनापती तात्या टोपे यांच्याशी झाला. दोन ध्येयवेडे एकत्र आले. तंट्याची सेना त्यांनी इंग्रजांच्या विरोधामध्ये संघर्ष करण्यास तयार केली. त्याचे स्फूर्तिदायक, प्रेरणादायी चरित्र कोण होता तंट्या भिल्ल, त्याला तंट्या मामा का म्हणायचे आणि इंग्रजांनी रॉबिन हूड म्हणून त्याला का संबोधले. तर अशा एका महान जनजाती शूर वीराची ही कहाणी आहे. वर्तमान मध्य प्रदेशच्या निमाड क्षेत्रामध्ये व खान्देश (महाराष्ट्र)मध्ये १८५० ते १८८९ या ४० वर्षांमध्ये ज्यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने, आपल्या पराक्रमाने आणि भिल्ल जातीच्या एकलव्य बाण्याने परकीय सत्तेच्या म्हणजे इंग्रजांच्या विरोधात, त्याच बरोबरीने शोषण करणाऱ्या सावकार आणि जुलमी जमीनदार यांच्या विरोधात सशस्त्र मुकाबला आपल्या शूरवीर बांधवांना संघटित

करून केला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून आणि सावकारांच्या शोषण व्यवस्थेतून आपल्या क्षेत्राला दोन दशके मुक्त केले त्या तंट्या भिल्लाचे चरित्र हे अत्यंत स्फूर्तिदायक, प्रेरणादायी आणि तत्कालीन क्रांतीकारक, शूरवीरांच्या तोडीचे आहे.

लहानपणीच आई वडिलांच्या झालेल्या हत्येच्या विरोधात अन्यायाने पेटून तंट्या उभा राहिला. आईच्या मृत्यूनंतर वडिलांनी तंट्याला सर्व बाबतीमध्ये प्रशिक्षित केले. यामध्ये गोफण फिरवणे, अचूक बाण मारणे, तलवार चालवणे, बंदूक चालवणे असे प्रशिक्षण त्याला मिळाले. भिल्ल जनजाती समाजाचा असल्यामुळे मुळातच शरीर अत्यंत काटक होते. गिरीकंदात, निसर्गाच्या सान्निध्यात, नर्मदा मध्येच्या भोवती बालपण व तारुण्य गेल्यामुळे काठीणतम डोंगर चढणे, दुथडीवर भरुन वाहणारी नदी भर पुरात पार करणे हा तंटयाच्या डाव्या हातचा खेळ होता.

अशा अनेक गोष्टी करता करता सावकारांच्या विरोधात तंट्याने आपल्या सोबत नवयुवक तयार करत त्यांची एक सशस्त्र फलटण उभी केली आणि सावकारांना धमकवण्यास सुरुवात केली. जे जे गरीब जनतेवर अन्याय करत होते, शोषण करत होते त्यांच्यामध्ये दहशत निर्माण केली. अनेक सावकारांची घरे लुटून तंट्या भिल्ल याने ती संपत्ती स्वतःकडे न ठेवता गरिबांमध्ये वाटायला सुरुवात केली. त्यामुळे हा देवाने पाठविलेला आपला तारणहार आहे अशी एक भावना समाजामध्ये निर्माण झाली.

विशेष करून महिलांच्या संरक्षणामध्ये तंट्याने आपली सत्शील नीतीमत्ता आणि सैन्य उभे केले.त्यामुळे प्रेमाने अनेक भगिनी त्याला आपला भाऊ म्हणू लागल्या. त्यामुळे अनेकांचा तो मामा झाला.

इंग्रजांविरुद्ध संघर्ष

ब्रिटिशांना सतत ११ वर्ष हुलकावणी देणारा हा क्रांतिवीर १५० वर्षांपूर्वी आदिवासी व शेतकऱ्यांना, सावकार, मालगुजार आणि जुलमी सरकार विरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणा देणार तंट्या हा आदिवासी, शेतकऱ्यांच्या क्रांतीचा पहिला नायक होय. त्याने सातपुड्याच्या दोन्ही भागात – खान्देश (तापी खोरे) व निमाड( नर्मदा) खोऱ्यातील आदिवासी शेतकऱ्यांत राष्ट्रीयत्वाची भावना जागवली. त्या काळी हा भिल्ल नायक आदिवासी, किसान ह्यांच्या पारतंत्र्याच्या बेड्या झुगारून देण्यासाठी एकाकी लढा देत होता. सावकारांच्या विरोधामध्ये लढणारी तंट्याची सेना त्यांनी इंग्रजांच्या विरोधामध्ये संघर्ष करण्यास तयार केली. त्यानंतरचा पुढचा कालखंड जर आपण पाहिला तर तंट्या मामा हा इंग्रजांच्या विरुद्ध शेवटपर्यंत प्राणपणाने लढला. जंगल, पहाड, नदी याचा आधार घेत ज्याप्रमाणे गनिमी पद्धतीने संघर्ष केला त्याच गनिमी काव्याने त्याने इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रजांनी हरप्रकारे प्रयत्न करूनही तंट्याला पकडणे शक्य होत नव्हते. एक वेळ अशी आली की त्याला पकडण्यासाठी इंग्रजांना विशेष अशी तंट्या ब्रिगेड निर्माण करावी लागली.

एकदा खंडवा कोर्टातील साक्ष पुरावे संपले होते. हिम्मत पाटलाची खोटी साक्ष व साक्षीदारांचे खोटे बयान ऐकून तंट्याभील खवळला म्हणाला, "हिम्मत दाजी, किती खोट सांगणार हायेस, म्या भिल्ल जातीचा आहे, आता पसतुर म्या गय केली, आता मातर पुढ गाठ आहे ह्या तंटयाशी . सुटून आलो तर बघुन घेइन तुझी सोय", तंट्या गरजला. हिम्मत पाटलाचा थरकाप उडाला. न्यायाधीश उद्या शिक्षा सुनावणार होते. गुन्हेगार दोषी ठरले होते. आरोपी रात्री खंडवा जेलमध्ये होते. त्यांच्यासाठी ती काळरात्र होती. त्यांना तुरुंगाची भक्कम कोठडीत डांबून होते व भिंती भक्कम होत्या. उंच तटबंदी होती. तंट्याचे विचार सुरू झाले होते. उद्या कोर्ट शिक्षा सुनावणार, कोणत्यातरी कोर्टात रवानगी होणार. ही तिसरी वेळ आली आहे. शेवटची संधी आहेत. त्याने आजूबाजूला निरीक्षण केले. मागच्या भिंतीला दोन पुरूष उंचीवर खिडकी होती. योजनेप्रमाणे सर्वे कैदी झोपी गेले होते. तंट्या भिंतीवर वाकला, पुरुषी शिडी केली. एकजण वर चढून चढून चुना काढून खिडकीला ओढून काढले, व बोगद्यातून पलीकडे उतरले. तटबंदी जवळ येवून धोतराचा दोर बनवला. व एकेक करुन पलीकडे उतरले. तंटयाने पोलिसांना अवाहन केले की, "ह्यो तंट्या चाललाय, जो कोणी मायीचे दुध प्यायला असेल त्याने मला पकडून दाखवाव." उजाडल्या पूर्वीच तो दूर जंगलात पळून गेला.

एकदा पोलीस अधिकारी शेर अली यांना म्हाताऱ्या माणसाने (चाचा) तंट्याचा पत्त्यावर जंगलात नेतो, असे सांगितल्. ते अधिकारी त्या व्यक्तीबरोबर दोन अधिक पोलीस घेउन गेले. खूप दूर जंगलात गेल्यावर, ती व्यक्ती म्हणाली, "मी पत्ता नाही सांगणार नाही. म्या तंट्या आहे. काय करणार शेर अली साहेब? मारुन दरीत टाकू तुम्हाला. जंगलात लांडगे, कुत्र्ये खाणार तुम्हाले? हात वर करा व कपडे काढा, मग जीव वाचवून पळा". सर्व पोलीस पळून गेले.

तसेच शासकीय अधिकाऱ्यांचे रेस्ट हाउस मध्ये घोडा-गाडीने वेश बदलवून जेवण करून परत जाणारा तंट्याभील? सर्वकडे तंट्या तर्फे लूट होणे, गरिबांना मदत करणे सुरूच होते. तंटयाला पकडून द्यायचे अवाहन ब्रिटिश पोलीस अधिकारीकडून स्वीकारले गेले. ते रेल्वेमार्गाने येत होते. रस्त्यात चालत्या गाडीत दोन हमाल चढले. पातालपानी(मध्य प्रदेश) रेल्वे थांबा आला. हमाल उतरले, आणि गोरे साहेबाला सलाम केला. साहेबांनीच सांगीतल्यावर सामान कॅम्प पर्यंत नेउ लागले. बोलता बोलता हमालाने सांगीतले की तंट्या शेजारच्या शेतकऱ्यांकडे अधून मधून येत असतो. तो डोंगरकपारीत रहातो. हे ऐकल्यावर ब्रिटिश पोलीस

अधिकारी खूष झाला. त्यानंतर त्या अधिकारीने सांगीतले की, तंटयावर मोठे बक्षीस ठेवले आहे , त्याला पकडून दिल्यावर ते तुम्हाला भेटेल. व ब्रिटिश पोलीस अधिकारी खुष होऊन काही रक्कम अग्रीम महणून हमालास दिली. सकाळी हमाल परत आला व हमालाने माहीती पुरवली व ते निघाले सुद्धा . खूप डोंगरकपारी मध्ये चालल्यावर साहेब थकले. थकल्या साहेबांना म्हणाला, "म्या तंट्याभील आहे पकडा मला." साहेबांचे हत्यार त्याने हिसकावून घेतले. व तो डोंगरकपारीत जंगलातून लपवाछपवी करतच पळाला.

एकदा या भागात लग्न होते. वरातीमागून नकली घोड्यावरून (बांबूपासून केलेल्या काड्याचया व रंगीत कागदाच्या पासून केलेल्या) एक माणूस नाचत होता. तो दोन-तीन चकरा मारून गेला. दोन-तीन पोलीसांनी त्या इसमास शंकेवरून त्यास साकळदंडाने बांधल्यावर पोलीसांनी त्याचे सोबत फेरी मारली. त्या इसमाने साकळदंडास जोराने झटका मारला. पोलीस पडले व साखळदंडाने पोलिसांचे कपडे काढून त्यानाच बांधले, आणि म्हटला, "कधी येसान काय तंटयाला पकडायला", असे म्हणत तंट्या जंगलात पळाला. तंट्या गनिमी काव्याने लढू लागला होता. एकदा तंट्या व त्याचे साथीदार पोलिसांचे वेशात एका गावात गेले. पोलीसी आवाजात मालगुजारास दरडावले त्याचे (मालगुजाराचे) गरीबांकडून जबरदस्तीने वसूल केलेले अन्न धान्य लुटून नेले. हे ऐकून छेगावचे फौजदार गोंधळले व म्हटले की, पोलीस वेशात दरोडेखोर येउन गेले.

ज्या काळात होळकर, निजाम, शिंदे आणि इतर संस्थानिक ब्रिटिशांविरुद्ध झुंजणयात होते. त्यावेळी ब्रिटिशांचा तोंडचे पाणी त्याने पळविले होते. एकाकी झुंज हे एक आदिवासी लढ्यातील सोनेरी पान आहे.
क्रमश:

१८५८ मध्ये खोट्या चोरीच्या आरोपांमध्ये इंग्रजांनी तंट्याला पकडले. परंतु मुझे कोई दिवार बंदिस्त नही कर सकती असे म्हणत (हिंदी भाषेतील चित्रपटातील नायका प्रमाणे ) तंट्या आणि त्याचे साथीदार जेलमधून इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन पसार झाले. कदाचित इंग्रजांच्या मगर मिठीतून सुटणारा व पुढे जबलपूरच्या जेलमधून आपल्या सहकाऱ्यांना सोडवणारा तंट्या हा एकमेव क्रांतिकारक असावा.

इंग्रजांच्या सर्व पर्वतीय मार्गाच्या व्यापारावर तंट्या भिल्ल सक्त पहारे ठेवले. अनेक वेळा खजिना लुटणे, इंग्रजांच्या अधिकाऱ्यांना ठार मारणे त्यातही ऐतद्देशिय शिपायांना पकडून सोडून देणे हे वारंवार होऊ लागल्यामुळे इंग्रजांनी काही काळ आपला व्यापारही तेथे बंद केला. निमाड क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने, आपल्या पराक्रमाने व आपल्या दयाशील दानशूर वृत्तीने जनतेमध्ये भगवानाच्या रूपामध्ये त्याची पूजा होऊ लागली. तंटयावर स्थानिक खूप खूष होऊन त्यांनी या लोकनायकावर लोकप्रिय लोकगीते तयार केली व ती जनतेत जनतेतून गाऊ लागली. काही गीते देण्यात येत आहे.

स्थानिक लोक म्हणायचे की, "यह कैसे हो सकता है की हम लोग भूके मरे और ब्रिटिश हमारी संपत्तीपर मजा करे?"

गीत 1

हे....हे...
अमन ज्वाल जंजिरा बांधे, उसी कोनमे तान!
जसे सलाखा जेहलकी, जो दम लहू बने तेजाब!!धृ!!
हे....हे....
हाड मास का तन नी तंटया, भैरव जी का श्वान!
भुसभुस गर्जे काल कोठडी, जद गरजयो तूफान!!धृ !!
हे....हे....
तोडी ताड जेल सलोखा, फांदी गयो दिवार!
भरी छलंगा उडयो हवामे, भैरव का अवतार!!धृ!!
हे....हे....

गीत.2

तंटया..तंटया..तंटया..तंटया..
वारे मरदोमे मर्द झंझार तंटया,
कंआधे टांगे डाव तिखो धारदार तंट्या,
भाई बहनोकी लाज रखवार तंटया,
तंटया..तंटया..
सुने बहिनाकी पुकार इस्पार , उसपार
पलका मूअंदा दौडा आहे बारबार तंटया
तंटया..तंटया...

जनतेच्या गळ्यातील तो ताईत झाला. त्यामुळे इंग्रज अत्यंत हतबल झाले. परंतु इंग्रज फारच हुशार व धोरणी होते. त्यांना असा शत्रू परवडणारा नव्हता. त्यामुळे त्यांनी काही काळ जरी माघार घेतली तरी त्यांनी तंट्याला काहीही करून पकडायचे ठरवले होते. इंग्रजांनी त्याला पकडण्यासाठी रुपये दहा हजार, पाचशे चे पुरस्कार जाहीर केले होतो. वीरतेने आपण तंट्याला पकडू शकत नाही हे सिद्ध झाल्यानंतर त्यांनी नेहमीप्रमाणे आपले पाताळयंत्री धोरण अवलंबून अशाच एका मानलेल्या बहिणीच्या नवऱ्याला फितवून भाऊबीजेच्या दिवशी तंट्याला पकडले व अटक केले. ही तंट्या भीलच्या अटकेची बातमी "न्यूयॉर्क टाइम्सच्या" १० नोव्हेंबर १८८९ च्या अंकात ठळकपणे प्रसिद्ध झाली होती. या बातमीत त्यांचे 'रॉबिन हूड ऑफ इंडिया' असे वर्णन करण्यात आले होते. इंग्रजांनी चौकशीचे नाटक करत 4 डिसेंबर 1889 रोजी फाशीवर चढवले. त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन न करता दूर रेल्वेच्या स्थानकाजवळ फेकून दिला. इंदूरजवळील खंडवा रेल्वे मार्गावरील पातालपानी रेल्वे स्थानकाजवळ त्याला फासावर लटकवून फेकण्यात आले होते. ज्या ठिकाणी त्याची चिता रचण्यात आली त्या ठिकाणी तंट्या मामाची समाधी मानली जाते.

आजही तंट्या मामाच्या सन्मानार्थ सर्व गाड्या या ठिकाणी क्षणभर थांबतात. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी इंदूरमधील पातालपानी रेल्वे स्थानकाचे "तंट्या भील " असे नामकरण करण्याची घोषणा केली. त्याचबरोबर इंदूर बसस्थानकाला तंट्या मामाचे नाव देण्यात येणार आहे ,असे दैनिकवृत्तपत्रातून कळाले.

एवढी दहशत ज्यांनी इंग्रजांमध्ये निर्माण केली, दुर्दैवाने त्या तंट्या मामाची ओळख मध्य प्रदेश(निमाड), महाराष्ट्र(खान्देश) च्या काही क्षेत्रात सोडली तर समग्र भारताला आजही नाही. किंबहुना अशा अनेक जनजाती वीरांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, देव, देश, धर्मासाठी आपले सर्वस्व बलिदान केले.परंतु त्यांचे नामो निशाण कुठेही आपल्याला पाहायला मिळत नाही.

....×××....

## माझी फोटोग्राफी -४

**-प्रमोद यादव**







आज तारीख 23 सप्टेंबर 2025. आज नामचे बाजार हॉटेल हिल टेन येथे विश्रांतीचा दिवस होता. कारण अगोदरच्या दिवशी मोठी चढण झाल्याने आणि अधिक उंचीवर आल्याने तेथील हवामानाशी शरीराला जुळवून घ्यायचे होते. म्हणून आजचा दिवस आमच्या टीम लीडर मिहीरने अगोदरच याची कल्पना दिली होती. सर्व ट्रेकर नामचे बझार या ठिकाणी थांबतात विश्रांती घेतात . शरीराला तेथील वातावरणाशी जुळऊन घेण्यासाठी याची नितांत गरज असते .

तब्येतीवर त्याचा परिणाम हळूहळू जाणऊ लागला होता . झोप नीट लागत नव्हती आणि जेवण देखील कमी होत चालले होते. वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी गरम पाणी पिणे खूप गरजेचे होते . सतत पाणी पिणे शरीरासाठी घेणे खूप गरजेचे होते. रोज कमीत कमी 4 लीटर तरी पाणी पिणे आवशक होते . जर तेवढे पाणी पिले नाही तर त्याचा शरीरावर परिणाम होत असे, तसे ते जाणवत होते . आज जरी सुट्टीचा दिवस असला तरी 300 मीटर उंचीवर जायचे होते. नामचे बाजार येथील सागर माथा म्युझियम येथून माऊंट एव्हरेस्ट चे विहंगम असे दृश्य दिसते. तेथून चांगल्या पद्धतीची फोटोग्राफी करता येईल असे अगोदर टूर गाईड ने सांगितले होते .

सकाळी नेहमीप्रमाणे पाच वाजताच उठत असल्याने, आज शेजारी असलेल्या पर्वतरांगांचे काही फोटो मिळतात का म्हणून कॅमेरा घेऊन रूमचे बाहेर आलो . फोटो चांगल्या पद्धतीने मिळेल आणि पूर्ण पर्वतरांग दिसेल अशा ठिकाणी मी थांबलो होतो. सूर्योदयाची वाट पाहत होतो कारण सूर्योदयाचे सुरुवातीचे किरण पर्वतरांगेवर पडल्यावर सुंदर असे त्याचे फोटो मिळतात, हे मला काश्मीरमधील ट्रेकिंग मध्ये समजलेच होते. त्यामुळे मी ही संधी वाया घालवणार नव्हतो . बराच वेळ तेथील फोटो काढून पुन्हा रूम मध्ये आलो

रूममध्ये आल्यानंतर सर्व आवरले आणि लागलीच नाश्त्याच्या साठी हॉटेलच्या मुख्य डायनिंग हॉलमध्ये आलो. हॉटेलचा मुख्य डायनिंग हॉल हा तसा तो गप्पां मारायचा हॉल असे. गरम शेगड्या व हिटर असलेले हे हॉल रूममध्ये थांबण्यापेक्षा कधीही हॉलमध्ये थांबणे चांगले होते . शिवाय तेथे इंटरनेट मिळत असल्याने जगाशी संपर्क करण्यासाठी ती एक चांगली संधी मिळत असे. साडेसात वाजता नाश्ता करून आम्ही सागरमाथा म्युझियम दिशेने निघालो.तशी बऱ्यापैकी चढण होती पण लवकरच त्या ठिकाणी आम्ही पोहोचलो. साधारण पोहचलो त्यावेळी साडेआठ वाजले असतील. ऊन,पर्वतरांगा आणि निळे आकाश यांची मस्त अशी रंगसंगती जुळून आली होती . तेथे अनेक ट्रेकर त्यात बहुदा जास्त हे फॉरेनर होते. मिहिरने आम्हाला समोर जी उंच पर्वत रांग दिसत आहे ती जगातील सर्वात उंच शिखरे आहेत.

समोर माउंट एव्हरेस्ट आणि आबा दबलम हा पर्वत शिखर दिसत होती . हे मिहिर नी दाखवले. तसे ते नजरेच्या दृष्टीने दूर असले तरी कॅमेऱ्याची लेन्स योग्य पद्धतीने सेट केल्याने त्या ठिकाणी त्या पर्वतरांगेचे क्लोजअप देखील सुंदर घेता येत होते. फोटोला चांगल्यापैकी स्पष्टता मिळत होती. तेव्हा तुम्ही पलीकडल्या बाजूला जाऊन माउंट एवरेस्ट चे अजून चांगले फोटो तुम्हाला मिळतील असे मिहिर ने सांगितले. साहजिकच त्या बाजूस जाऊन फोटो घेऊ लागलो आणि

खरेच त्या ठिकाणावरून माउंट एव्हरेस्टवर एकदम स्पष्ट दिसत होता . त्यावर कुठे ढग दिसत नव्हते त्यामुळे फोटोची स्पष्टता मिळत होती.

आता या ठिकाणी माऊंट एव्हरेस्टचे पर्वत रांगांचे फोटो काढल्यानंतर पुढील बाजूस शेर्पा तेन सिंगचा पुतळा आहे. त्याने हातात त्याला आपण जे बर्फ खोदण्यासाठी हत्यार लागते ते धरले आहे. आपल्याकडे त्याला टिकाव म्हणतात. पण टिकाव वजनाने जड असतो. पण हे हत्यार सहज चालवता येईल आणि बर्फ फोडता येईल असे हलके असते . ते हातात उंचवलेले आहे बरोबर माऊंट एव्हरेस्ट जे शिखर आहे त्याच्यावर त्या दुतोंडी टिकावाचे एक टोक त्यावर ठेवलेले आहे तो माउंट एवरेस्ट आहे.तो फोटो मी सोबत टाकत आहे .तिथून काढलेला फोटो खूपच सुंदर आहे हिमालयाचं विहंगम दृश्य त्या ठिकाणी दिसते .आणि आपल्याला या वसुंधरेची भव्यता केवढी मोठी आहे याचे आपण आकलन करत असतो, पण ते कोडे काही सुटत नाही. कारण ती भव्यता आपल्या विचारपेक्षा कितीतरी पटीने मोठी आहे.

तेथील फोटो काढल्यानंतर आम्हाला दुसरीकडे तीनशे मीटर ऊंची वर चालत जायचे होते. तेथून खाली उतरल्यानंतर समोरच्या बाजूला वरील बाजूस चालण्यासाठी सुरुवात केली. मिहीरने सकाळी माऊंट एवरेस्ट फोटो चांगले मिळतील म्हणून प्रथम सागरमाथा म्युझियम येथे तो घेऊन गेला.त्याचा तो अंदाज बरोबर ठरला आणि फोटो घेऊन समोरच्या तीनशे मीटर उंचीवर जाणे साठी आमचे ट्रेकिंग सुरू झाले. जरी सोपे असले तरी हवेतील ऑक्सिजन विरळपणा जाणवत होता. दमछाक चांगलीच होत असे पण 1.30 वाजेपर्यंतच आपणास परत यायचे आहे त्यामुळे खुशीतच सर्व जण होते .

आम्ही चढण्यास सुरुवात केली होती, त्या ठिकाणी आम्ही एक तासात पोहचलो . त्या ठिकाणी सुंदर माहिती केंद्र उभारले आहे . या माहिती केंद्रात फिल्म दाखवली. माऊंट एवरेस्ट ट्रेक शिवाय ट्रेकिंग बद्दलची सर्व माहिती दिली जाते .माउंट एव्हरेस्टवर किती कचरा आहे गेले कित्येक वर्ष तिथे अनेक गिर्यारोहक जात आहेत.त्यांचे मुळे तेथे कसं कचरा वाढत आहे हेही फिल्म मधून दाखवले जाते . त्यांचे कपडे ,त्यांचे खाण्याचे पदार्थ,ऑक्सशीजन सिलेंडर यांचा कचरा तेथे कितीतरी साठलेला आहे. हे जेव्हा लक्षात आल्यानंतर तो कमी कसा त्या करता येईल याच्याबद्दल जगभर विचार सुरू झाला. आणि हळूहळू तेथील कचरा कमी करण्याचे प्रयत्न सुरू झाले.या साठी नेपाळ सरकार तेथील संस्था प्रयत्न करत आहेत .

सागरमाथा वरील बाजूस पोहचलो . तिथे अप्रतिम अशी माहिती सेंटर तेथे उभे करण्यात आलेले आहे. माऊंट एव्हरेस्ट बद्दलची छोट्या फिल्म तेथे दाखवले जातात. पर्यावरण जागृती बद्दल काय करता येईल याची माहिती अप्रतिम तिथे दिलेली आहे. यातून आपण काय बोध घ्यायचा. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खुणा असलेल्या किल्ल्याबाबत काय विचार करायचा हा पटकन विचार तिथे आला. कळसुबाई वर गेलो सिंहगडावर गेलो रायगड वर गेलो समुद्राच्या काठावर गेलो सगळीकडे प्लास्टिक, पाण्याच्या बाटल्या आणि तो कचरा दिसतोय.कधी सुधारणार आपण या कचऱ्याबद्दल कधी चांगली भूमिका घेणार. पुणे महानगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापन असताना खूप प्रयत्न केले. परंतु त्या ठिकाणी यश मिळण्यासाठी नागरिकांची जेवढी साथ हवी तेवढी ती मिळत नाही. तीच गोष्ट कळसुबाई बाबत आहे आणि तीच गोष्ट सिंहगडाबाबत आहे.जो कचरा आपण करतो त्यामध्ये चॉकलेटचे कव्हर, कुरकुरे रेपर ,पाण्याच्या बाटल्या याशिवाय खाद्यपदार्थ आपण घेऊन जातो. पण ते संपले की त्या ठिकाणी ते फेकून देतो.आणि अगदी प्रसन्न मनाने आपण परतीच्या प्रवासाला लागतो .पण तो कचरा प्लास्टिक आहे त्याचे विघटन होत नाही. आपल्यासारखा एकटाच पर्यटक तिथे नसतो हजारो पर्यटक तिथे जात असतात प्रत्येकाने तिथे गेल्यानंतर कचरा केल्यावर काय अवस्था होईल. हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे .

नेपाळ गव्हर्मेंटनी या ट्रेक वर सुंदर अशा कचराकुंड्या बांधलेल्या आहेत. त्याच्यातच बहुतेक सर्वच ट्रेकर कचरा टाकतात. आणि नंतर तो बॅगमध्ये भरून बाहेर वाहतूक करून आणला जातो.

नामचे बाजार मधून आम्ही सर्वांनी एक एक किलो प्लॅस्टिक कचरा तेथील कचरा कलेक्शन केंद्रातून घेऊन ती एक सेवा म्हणून लुकला येथील कचरा जमा करणारे सेंटरला आणून दिला. हे पाहता कचरा व्यवस्थापन हे जगामध्ये सगळीकडे व्यवस्थित असताना भारतामध्ये खूप अवस्था खराब आहे. निवडणुका ड्युटी मध्ये हे पाहिले आहे. ब्रह्मपुत्रा पाहिली, गंगा पाहिली नर्मदा पाहिली आणि कावेरी देखील. वाईट वाटते त्यांना आपण माता म्हणतो त्या आपल्या नद्यांची अवस्था खूप खूप वाईट आहे. यासाठी सरकार आणि नागरिक यांनी सखोल असे प्रयत्न करून यावर मात करता येईल. पण याचे गांभीर्य ना सरकारला ना नागरिकांना. पुण्यातील नदी तर खूप वाईट अवस्था आहे. एवरेस्ट असा कचरा साठलेला आहे हळूहळू कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. यावर पुढील टॉपिक मध्ये मी सविस्तर लिहिन . आपल्याकडील कचऱ्याची विल्हेवाट कशी लावता येईल याचा आपण सगळ्यांनी जर विचार केला तसे प्रयत्न केले तर , आपल्यापासूनच आपण सुरुवात करू. मी तर ही सुरुवात कित्येक वर्षांपूर्वीच केलेली आहे.

ट्रेक पूर्ण करून हॉटेल वर आलो.दुपारचे साधारण जेवण करून गप्पा मारीत बसलो. रात्री जेवण व्यवस्थित होत नव्हते आणि झोपही . हवामानाचा बदलाचा परिणाम तब्येतीवर होऊ लागला हे जाणवत होता . रात्रभर तशी झोप आलीच नाही असे म्हणले तरी चालेल. परंतु मनाची प्रचंड या शक्ती प्रबळ असल्याने पुढील ट्रेक साठी पुन्हा तयारी करायची होती...उद्याचा दिवसाची

क्रमशः



## आरोग्य साधना

**नेहमी कृतिशील रहा व सकारात्मक विचार ठेवा.**

- **वरचेवर मित्रांच्या संपर्कात जरूर रहा मनसोक्त पैसे ,वेळ खर्च करा**
- **आयुष्य मर्यादित आहे आणि जीवनाचा जेंव्हा शेवट होईल, तेंव्हा इथली कोणतीच गोष्ट आपल्या सोबत नेता येणार नाही.**
- **मग जीवनात खुप काटकसर कशासाठी करायची ? आवश्यक आहे तो खर्च केलाच पाहिजे ज्या गोष्टींतुन आपणास आनंद मिळतो त्या गोष्टी केल्याच पाहिजेत.**
- **आपण गेल्यानंतर पुढे काय होणार याची मुळीच चिंता करु नका. कारण आपला देह जेंव्हा मातीत मिसळून जाईल तेंव्हा कुणी आपले कौतुक केले काय किंवा टीका केली काय ?**
- **जीवनाचा आणि स्वकष्टाने मिळवलेल्या पैशांचा आनंद घेण्याची वेळ निघून गेलेली असेल ...!**
- **तुमच्या मुलांची खुप काळजी करु नका. त्यांना स्वतःचा मार्ग निवडू द्या. स्वतःचे भविष्य घडवू द्या. त्यांच्या ईच्छा आकांक्षाचे आणि स्वप्नांचे तुम्ही गुलाम होऊ नका .**

## दृष्टिकोन .....

माणसं कमावण्याची जबरदस्त नशा असते वयाच्या एका टप्प्यापर्यंत.आपल्यापैकी अनेकांना ती असते. माणसं जोडणं ही छानच गोष्ट, अनेकांसाठी ती एक अभिमानाची बाब असते. जरूर असावी. चांगला स्वभाव आणि उत्तम चारित्र्य याच्या जोरावर अनेक माणसं जोडावीत, जपावीत.

पण हे करताना ही जपलेली माणसं आपल्यालाही 'जपत' आहेत ना हे बघणं फार महत्त्वाचं असतं. अनेकदा आपल्याला वाटून जातं, अरे बापरे. ही अमुक इतकी 'भारी' व्यक्ती आपल्यासोबत संपर्क ठेवून आहे. म्हणजे किती छान. त्या संपर्कामागे विशुद्ध भाव आहे ना, की पुढे जाऊन आपला 'स्टेपणी' म्हणून उपयोग केला जाणार आहे हे बघायला हवं. अशा अनेक अनुभवांतून आपण जात असतो, त्यामुळे 'हुरळून' जाणं टाळायला हवं.

तुम्हाला माणसं जोडावीशी वाटतात हा तुमचा चांगुलपणा असतो, पण त्याला तुमचा भावनिक कमकुवत पणा समजणारे खूप लोक असतात. त्यामुळे आपल्या चांगुलपणाचं इतकंही प्रदर्शन करू नये की तो संशयास्पद वाटू लागेल.

अनेकदा एखादी व्यक्ती आपल्याला अत्यंत जवळची, जिवलग वाटत असते, आपली सुख दुःखं आपण तिला सांगत असतो. पण आपल्या वेदनांचा वापर पुढे ती आपलं मनःस्वास्थ्य उद्ध्वस्त करणारा दारुगोळा म्हणून देखील करू शकते. माणसांना इतकंही पोटाशी धरू नये की ते पुढे आपल्यावर लाडाने दुगाण्या झाडू लागतील. माणसं जोडताना कोणाला कोणत्या पायरीपर्यंत जवळ येऊ द्यावं हे ठरवून घ्यायला हवं. लायकी नसलेल्या एखाद्या व्यक्तीला फार जवळ केल्याचा अतोनात त्रास आयुष्यभर भोगावा लागू शकतो.

लोक तुम्हाला खांदा द्यायला नसतात बसलेले, अनेकदा तुम्ही रडण्यासाठी त्यांचा खांदा जवळ करता, हे त्यांना एंटरटेनिंग वाटू शकतं. दुःखावर बांधावीत अशी माणसं फार विरळा असतात. मन मोठं करून समोरच्याला मदत करणं, त्याचं चांगलं व्हावं यासाठी प्रयत्न करणारी भली माणसं जगात आहेत, नक्कीच आहेत. पण भसाभस माणसं जमवण्याच्या नादात दाण्यांपेक्षा बणग्याच जास्त गोळा होतात. त्यातली एखादी आयुष्यभर कुसळा सारखी टोचत राहते, असह्य वेदना देते.

'भारावून जाणं' ही एक फारच भाबडी गोष्ट आहे.कोणाच्या एवढ्या तेवढ्या गोष्टीने भारावून जाणारी माणसं आपल्यात असतात. फार जवळ जाऊन बघितलं की समोरच्या माणसाचे पायही मातीचे आहेत हे लक्षात येतं आणि अतोनात निराशा वाट्याला येते. माणसांतलं चांगलं ते जरूर वेचावं, त्याचं कौतुक करावं,जमल्यास आचरणात ही आणावं.

काही माणसं समोरून फार छान वाटतात, आदर्श वाटतात. आपण त्यांना आपलं मानत राहतो, फॉलो करत राहतो. आणि एका विवक्षित क्षणी कळतं, की काहीही घेणं देणं नसताना ही माणसं आपल्या सोबत किती खोटं, कृतक वागत होती, मागे डावपेच करत होती. मग जीव उबतो, त्या नात्याची शिसारी येऊ लागते. यावर पर्याय काय ? 'माणसांच्या फार जवळ न जाणे'. लांबून जे दिसतं त्यात आनंद मानावा. माणसं आपल्या समोर जे वागतात, बोलतात ते आणि तेवढंच खरं मानून पुढे निघावं, फार खोलात जाऊन गोष्टी जाणून घेण्याचा हट्ट करू नये. अपेक्षा भंग वाट्याला येतो.

माणसं कमावणं म्हणजे त्यांना आपल्या आयुष्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार देणं नव्हे. काही व्यक्ती आपले पणाच्या हक्काने काही गोष्टी सांगत असतात. त्या नम्रपणे ऐकून घेण्याची क्षमता ठेवावी.चार कटू गोष्टी ऐकाव्या लागल्या तरी त्यातून पुढे आपला भलंच होणार आहे हे आपण जाणून असावं. अर्थात आपलं खरोखरच भलं व्हावं म्हणून स्वतःचा वेळ देऊन आपला कान पकडणारं कोण आणि आपलं भलं पाहून पोटदुखी होणारे कोण यातला फरक आपल्याला ओळखता यायला हवा.

माणसं जरूर जोडावीत, जपावीत, एकमेकांच्या भावना आपल्याला दुखावू शकेल इतके अधिकार कुणाला देऊ नयेत. जगायला माणसं लागतातच, पण 'आतल्या' वर्तुळात कोणती माणसे घ्यायची आणि 'बाहेरच्या' वर्तुळात कोणती माणसं ठेवायची याचं गणित एकदा जमायला लागलं की सोपं होतं जगणं.

हेच जमणं आणि जमवणं महत्वाचं असतं.

## वाचक प्रतिक्रिया - सेवक वार्ता, जानेवारी-२०२६

- अतिशय उत्तम. लेखणीतील कौशल्य वाखाणावे तितके कमीच - विश्वास सावरकर.
- सेवक वार्ता जानेवारी २०२६ चा सेवक वार्ता अंक सोनेरी, सुबक, सुंदर, सर्वांगीण आहे. श्री. गवळी यांच्या परिश्रमाचे कौतुक केले पाहीजे. सहा वनाधिकारी/कर्मचारी यांच्या निधनाची वार्ता मन हेलावणारी आहे. – व्ही. टी. पत्की
- गवळी सर यांचे टॉप टीप चे आणि नियमित येणारे वृताकन पाहता त्यात नमूद बाबी सुद्धा स्टँडर्ड , दर्जेदार असतात.निवडलेला पिवळा रंग हा सोनेरी सूर्यकिरणांच्या मोहक आहे. मी पाहिले आहे गवळी सर हे कोणतेही काम अंत्यंत टापटिपीने, स्वच्छ, मोहक करत असतात. माझ्यासारखे "हब कब ते झब कब"असे नसते. वेळ, नियमितता, प्रामाणिकपणा हे गुण त्यांचे अंगी असल्याने ते वरिष्ठ पदाला पोहचले. सेवानिवृत्तीनंतर त्यांची वन अधिकारी याना ज्ञान दान देण्याची सहज प्रवृत्ती त्यांचें अंगी आहे. आपल्या संघाचा दरमहाचा रोखलेका c.a. कडे पाठवताना बिनचूक, पूर्ण, पुरावा, बिले, तारीख सह असतो. त्यांचे कार्यास सलाम करतो.

  - जयप्रकाश आनंदराव पाटील
- सेवक वार्ता, जानेवारी 2026 चा अंक नेहमीप्रमाणे नेटका व वाचनीय आहे. खासकरून प्रमोद यादव यांची फोटोग्राफी-३ व अस्सल पुणेकर यांचा म्हैस हा लेख. ह्या निमीत्ताने महानगरामधील वाहतूक व रस्ता क्रास करणेची समस्या अधोरेखित केली आहे असे वाटते.

  - एन. ए. पाटील

Very good and informative issue of SEVAK warta! Congratulations Sambhaji! Keep it up. We are proud of you. Wish you a very happy new year.

-डॉ. एस. एच. पाटील

- छान अंक, श्री गवळी साहेब यांना व त्यांच्या सेवाभावी वृत्ती ला, शतःशा नमन, न चुकता अखंडीत दर महिन्याला उत्कृष्ट सेवक वार्ता माहीती संकलित करून, लिहून, एडिटिंग करून आपणासर्वासाठी प्रकाशित करत आहेत.

  - उमेश धोपेश्वरकर
- उत्कृष्ट अंक. keep it up . - पी.के. कुलकर्णी
- उत्तम मांडणी व दर्जेदार छपाई." ह्याला आयुष्य म्हणावे काय "वास्तव जीवन सांगणारे काव्य. अनामिक कवीचे अभिनंदन. गवळीसाहेब यांना धन्यवाद –विठ्ठल भावे

## वेधक वृत्त

## वारली संस्कृती व वारली कलेचा सन्मान भिकल्या लाडक्या धिंडा यांना 'पद्मश्री'




आदिवासी संस्कृतीचा आणि वारली कलेचा अविभाज्य भाग असलेल्या 'तारपा' वाद्याला आपल्या श्वासाने जिवंत ठेवणारे, पालघर जिल्ह्याचे सुपुत्र भिकल्या लाडक्या धिंडा यांना केंद्र सरकारतर्फे प्रतिष्ठेचा 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला या पुरस्कारांची

घोषणा होताच पालघर जिल्ह्यात आणि कला विश्वात आनंदाची लाट पसरली आहे.

वारली संस्कृतीचा जागतिक सन्मान

भिकल्या धिंडा हे पालघर जिल्ह्यातील डहाणू/जव्हार पट्ट्यातील जव्हार तालुक्यातील वाळवंडा या गावाचे रहिवासी आहेत

गेल्या अनेक दशकांपासून ते 'तारपा' या पारंपरिक आदिवासी वाद्याच्या माध्यमातून वारली संस्कृतीची सेवा करत आहेत. त्यांच्या या निस्सीम सेवेची दखल घेत भारत सरकारने त्यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर केला आहे.

कोण आहेत भिकल्या धिंडा?

पार्श्वभूमी: भिकल्या धिंडा हे वारली आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून वर येत त्यांनी आपली कला जोपासली आहे.

कलासाधना: तारपा हे वाजवण्यासाठी अत्यंत कठीण असे वाद्य मानले जाते, ज्यासाठी प्रचंड दमसासाची (Breath control) गरज असते. भिकल्या धिंडा हे वयोवृद्ध असूनही आजही तितक्याच ताकदीने आणि तन्मयतेने तारपा वादन करतात.

वारसा: केवळ वादनच नव्हे, तर नवीन पिढीला हे वाद्य शिकवून ही कला लुप्त होऊ नये यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांनी अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय महोत्सवात आपल्या कलेचे सादरीकरण केले आहे.

'तारपा' : आदिवासींच्या हृदयाची स्पंदने

तारपा हे केवळ एक वाद्य नसून ती वारली समाजाची ओळख आहे. सुकलेला भोपळा, बांबू आणि ताडाच्या पानांपासून हे वाद्य बनवले जाते. दिवाळीनंतर सुरू होणाऱ्या आदिवासी नृत्यांमध्ये तारपा वादनाला अनन्यसाधारण महत्त्व असते. भिकल्या धिंडा यांच्या रूपाने आज याच परंपरेचा गौरव झाला आहे.

पालघर जिल्ह्यात जल्लोष

भिकल्या धिंडा यांचे नाव पद्म पुरस्कारांच्या यादीत झळकताच त्यांच्या गावात ग्रामस्थांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. "हा केवळ भिकल्या दादांचा सन्मान नसून, हा संपूर्ण आदिवासी संस्कृतीचा आणि कष्टकरी कलाकारांचा सन्मान आहे," अशा भावना स्थानिक कलाकारांनी व्यक्त केल्या आहेत.

❖❖❖❖

## नवीन सदस्य

१.श्री. एस. एन. कावळे, निवृत्त वनपाल अमरावती हे आजीवन सभासद शुल्क भरून सेवक संघाचे सदस्य झाले.

२. श्री. समीर देशपांडे, निवृत्त सवसं ठाणे हे पुणे शाखेतआजीवन सभासद शुल्क भरून सेवक संघाचे सदस्य झाले.

वरील सर्वांचे सेवक संघ परिवारात सहर्ष स्वागत.

## *निधन वार्ता*



जळगांव येथील रहिवाशी व सेवक संघ, धुळे शाखेचे आजीवन सदस्य दिनकर नारायण ,सेनि सवसंर यांचे दि.२०/०२/२०२६ सकाळी ८:४२ रोजी राहते घर ११५ गणेश कॉलोनी जळगांव येथे अल्पश्या आजाराने निधन झाले. त्याच रोजी अमरधाम - नेरी नाका, जळगांव येथे त्यांचेवर अंत्य संस्कार करण्यात आले. ते कै. डॉ. पी. एन. पाटील, यांचे भाऊ होते.यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली .

## सरते शेवटी ......

तुम्हाला किती लोक ओळखतात हे महत्वाचे नाही.

तर लोक तुम्हाला कशासाठी ओळखतात हे महत्वाचे आहे.

**********

**माणसाने श्रीमंतीचे कौतुक जरूर करावं, पण साधेपणाला दारिद्य कधीच समजू नये.**

केवळ खाजगी वितरणासाठी....

प्रकाशक:सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादक: एस.के. गवळी

कार्यालय: - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वन भवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६